**Q.P. Code :02642**

[**वेळ :तीन तास**] [**गुण :१००**]

Please check whether you have got the right question paper.

सूचना : 1. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
2. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१.** अ) 'वाटेवरच्या सावल्या' या लेखाच्या आधारे कवी कुसुमाग्रजांची जडणघडण कशी झाली ते सविस्तर स्पष्ट करा. **२०**

**किंवा**

आ) अपयशाने खचून न जाता दया पवार यांनी आपले शिक्षण पूर्ण करून साहित्य क्षेत्रात नावलौकिक कसा प्राप्त केला ते 'संगमनेरचे दिवस' या लेखाच्या आधारे विशद करा.

**प्र.२.** अ) सुशीलकुमार शिंदे यांच्या जीवनातील संघर्षमय वाटचालीची ओळख 'कोठे होतो कोठे आलो' या लेखातून कशी घडते ते विशद करा. **२०**

**किंवा**

आ) चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी एल. एल. बीच्या परीक्षेत आलेल्या अपयशावर मात करून एक यशस्वी न्यायाधिश म्हणून नावलौकिक कसा प्राप्त केला ते 'शब्दाचे मोल' या लेखाच्या आधारे स्पष्ट करा.

**प्र.३.** पुढीलपैकी कोणत्याही दोन टिपा लिहा. **१०**

अ) महात्मा गांधीजींची सत्यनिष्ठा.
ब) सी. रामचंद्रन यांचे पुण्यातील संगीत शिक्षण.
क) वाय.सी.पवार यांनी अनुभविलेला पानशेत धरणफुटीचा प्रसंग.
ड) यशवंतराव गडाख यांचे सोनईच्या शाळेतील अनुभव.

**प्र.४.** अ) श्री. सद्‌गुरू लोकमान्य वाचनालयाच्या वार्षिक सभेचे इतिवृत्त लिहा. **१०**

**किंवा**

आ) निर्मला वॉशिंग पावडरची विक्री कमी झाल्याची कारणे शोधून त्यावर उपाय शोधण्यासाठी नियुक्ती केलेल्या समितीचे अहवालात्मक इतिवृत्त तयार करा.

**प्र.५.** अ) श्री. गोगटे यांच्या केशर हापूसच्या विविध उत्पादनांची वर्तमानपत्रासाठी जाहिरात तयार करा. **१०**

**किंवा**

आ) 'निर्मिती' शिवणयंत्रांची' कंपनीचे नाव, मुद्रा व घोषवाक्य यासह वर्तमानपत्रासाठी जाहिरात लिहा.

**पुढे पहा**



2C7370767C7B450E28DCC849F6CF509C

**प्र.६.** पुढील कोणत्याही उताऱ्याचे आकलन करून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. **१०**

अ) पाऊसभरल्या श्रावणाने मराठी भाषा आणि मराठी लोकसाहित्य किती म्हणून समृद्ध केलेले आहे ! श्रावण म्हणजे भरगच्च सणावारांचा अन् व्रतवैकल्याचा महिना. इथला प्रत्येक सणवार, प्रत्येक व्रतवैकल्य गाण्यांनी बहरलेले आणि कहाण्यांनी डवरलेले आहे. श्रावणातले मराठी घर एकेकाळी सकाळपासून संध्याकाळपर्यंत नव्हे रात्रीही दीर्घकाळपर्यंत मराठी भाषेच्या सुंदर विलासांनी नटलेले असे. कुठे एखादी पोक्त बाई भोवताली गोल करून बसलेल्या आयाबायांना तालासुरात गाणी ऐकावीत आहे, कुठे चारपाच सवाष्णी हातातली तबके नि निरांजने सावरीत सुस्वर आरत्या गात आहेत, कुठे एखादे घराच्या घर मंगळागौरीच्या झिम्माफुगडयाने, गाण्यागोष्टीने आणि हास्यविनोदाने किलबिलून गेले आहे; तर कुठे लहानमोठ्या पाचपंचवीस स्त्रिया फेर धरून नागोबा देवाची अन् वारूळ पूजेचीच गाणी गात आहेत, अशी मनोरम दृश्ये दिसत. ही दृश्ये आज अगदी नाहीशी झालीत असे नव्हे, पण ती दुर्मिळ मात्र नक्की झाली आहेत.

या श्रवणाचे मराठी भाषेवर फार मोठे उपकार आहेत. सुंदर दैवतकथा (उदा.,मंगळागौरीची कहाणी ) वरांच्या नि व्रतांच्या गोड कहाण्या, आरत्या, झिम्माफुगडयांची गाणी इत्यादी अवीट गोडीचे लोकसाहित्य या महिन्याने दिले आणि जागवतही ठेवले. सृष्टीबरोबरच मराठी भाषाही श्रावणात कशी अंगभर बहरत फुलत असते. उदा. पाहाना, मंगळागौरीची संपूर्ण रात्र स्त्रीभाषेने नुसती निनादत राहते. गानकला, नृत्यकला, नाट्यकला आणि साहित्यकला इथे हातात हात घालून जणू फेर धरतात. मराठी कुटुंबात एरव्ही कोंदाटलेले स्त्रीमन इथे खळखळून हसते, भरभरून बोलते आणि अंगभर डोलते. ज्या कुणी अनाम स्त्रियांनी ही मंगळागौरीची गाणी, नाटयखेळ, चुटके - कोडी आणि कथा - कहाण्या रचल्या त्या केवळ वंदनीयच होत आणि श्रावणातल्या व्रतवरांच्या कहाण्या तर केवढा मोठा ठेवा होय ! सोमवारची ती खुलभर दुधाची कहाणी ! तिच्यातल्या म्हातारीच्या खुलभर दुधाने शिवाचा गाभारा भरण्याच्या चमत्कारासाठी महत्त्वाची नाही. तिच्यात कुटुंबाला, समाजाला सुखी ठेवण्याचा जो संदेश आहे तो हृद्य आहे. वासरांना, पोराबाळांना अगोदर पोटभर दुध द्या आणि मग उरलंसुरलं देवाच्या चरणी वाह, असे म्हणणाऱ्या त्या गरीब म्हातारीकडे एक संपन्न समाजमन होते.

शुक्रवारच्या कहाणीत दरिद्री बहिणीला भाऊ भरल्या पानावरून उठवतो व हाकलून देतो. पुढे दिवस पालटतात. बहीण सधन होते. मग हाच भाऊ तिचा आदरसत्कार करून तिला घरी जेवायाल बोलावतो. जेवायला बसताना बहीण अंगावरचे सर्व अलंकार पाटावर काढून ठेवते आणि त्यांनाच एकेक घास जेवण भरवू लागते. ते पाहून चक्रावलेला भाऊ तिला म्हणतो, “तू हे काय करते आहेस ?” त्यावरचे तिचे उत्तर खूपच बोलके आहे. ती म्हणते, “अरे जिला तू जेवायला बोलावलंस तिला भरवते आहे. बाबा रे, हे जेवण माझं नाही. ते लक्ष्मीचं जेवण आहे” आणि पुढे ती म्हणते, “माझं जेवण होते ते मी सहस्त्रभोजनाच्या दिवशी जेवले.” जीवनविषयक अभिज्ञान हे लघुकथेचे बळ असते. शुक्रवारच्या कथेत केवढे मोठे अभिज्ञान भरलेले आहे ! ते केवळ मराठी कुटुंबापुरते सीमित नाही, हे अभिज्ञान वैश्विक पातळीचे आहे. त्यामुळे श्रावणात शुक्रवारी घरोघर वाचली जाणारी ही कहाणी मला मराठीतील एक श्रेष्ठतर लघुकथाच वाटते.

**पुढे पहा**



2C7370767C7B450E28DCC849F6CF509C

१) मराठी साहित्य कोणी समृद्ध केले आहे?

२) 'श्रावण महिन्याचे मराठी भाषेवर. फार उपकार आहेत' असे लेखकाला का वाटते?

३) सोमवारच्या कहाणीतून कोणता संदेश मिळतो?

४) मंगळागौरीच्या निमित्ताने कोणकोणत्या कलांचा एकत्रित संगम पहावयास मिळतो?

५) 'शुक्रवारची कहाणी मला मारठीतील एक श्रेष्ठतर लघुकथाच वाटते' लेखकाचे हे विधान स्पष्ट करा.

**किंवा**

आ) 'आत्मचरित्र' लेखन हा एक अत्यंत अवघड प्रकार आहे. पुष्कळशी आत्मचरित्रं ही आत्मसमर्थनासारखी असतात किंवा आयुष्यात घडलेल्या प्रसंगातून निवडलेल्या प्रसंगाची साखळी असते. सत्य आणि असत्य यांना मन ग्वाही करून लिहिलेली आत्मचरित्रं फारच थोडी. पण प्रसंगाच्या निमित्तानं का होईना त्यातून समाजपरिस्थितीचे आणि लेखकाचे अभावितपणाने दर्शन घडत असते. आपला बडेजाव सांगण्यासाठी लिहिलेली आत्मकथा, आपल्याविषयी अनुकंपा निर्माण व्हावी म्हणून लिहिलेली आत्मकथा आणि लक्ष्मीबाईंनी लिहिलेल्यां स्मृतीचित्रांसारखी जीवनातील अनेक चित्रं सहजपणानं काढत गेलेली आत्मकथा यातला फरक चतुर वाचकांच्या ध्यानात येतो. आत्मकथा लिहायला एक विलक्षण अलिप्तता लागते. लेखक किंवा लेखिका ज्या काळात किंवा समाजपरिस्थितीत लहानाचे मोठे होत गेले त्याची वर्णनं ऐतिहासिक कागदपत्रांइतकी महत्त्वाची असतात. पण त्यातही लेखकांची स्मरणशक्ती पुष्कळदा दगा देते. सर्वसामान्यपणानं मला असं वाटतं की जे निर्मितिक्षम साहित्यिक आहेत त्यांच्या आत्मचरित्रापेक्षा साहित्यिक नसलेल्या स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मकथा या सत्याच्या अधिक जवळ गेलेल्या आहेत. त्यात भाषेच्या किंवा कल्पनांच्या विचाराला जागा नाही. ते घडलं ते सांगितलं असाच या चरित्रांचा बाज असतो. दलित लेखकांनी लिहिलेल्या जीवनात ज्या घटना घडतात त्याला एक विशिष्ट सामाजिक परिस्थिती मुख्यत: जबाबदार असल्यामुळं त्या चरित्रांना ऐतिहासिक कागदपत्रांचं महत्त्व आहे. स्त्रियांच्या दु:खांनाही रुढीच पुष्कळदा जबाबदार असलेल्या दिसतात. त्यामुळं दडपून टाकलेल्या अवस्थेचा एक समान धागा स्त्रियांच्या चरित्रातूनही दिसतो. दलित स्त्रीचं दु:ख एकतर ही स्त्री म्हणून आणि दुसरं दलित म्हणून दलितावस्थेच्या यातना भोगणारे दलित पुरुषही आपल्या स्त्रियांचं जीवन असह्य करताना आढळतात. अशा स्त्रिया जेव्हा धैर्यानं पुढं येऊन आत्मचरित्रं लिहितील त्या वेळी त्याचं मोल ऐतिहासिक कागदपत्रांइतकं महत्त्वाचं ठरेल.

१) 'आत्मचरित्र लेखन' हा एक अत्यंत अवघड प्रकार आहे. असे लेखकाने का म्हटले आहे.

२) आत्मकथा लेखनासाठी कोणता गुण महत्त्वाचा आहे?

३) लेखकाच्या मते सत्याच्या अधिक जवळ गेलेल्या आत्मकथा कोणत्या?

४) स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मकथनांचे स्वरूप कसे असते?

५) दलित लेखकांनी लिहिलेल्या चरित्रांना एतेहासिक कागदपत्राचे महत्त्व कशामुळे आले आहे?

**पुढे पहा**



2C7370767C7B450E28DCC849F6CF509C

**प्र.७.** खालीलपैकी कोणत्या एका उताऱ्याचे सारांशलेखन करा. **१०**

उतारा क्र .१

मराठी भाषा मरणपंथास लागलीच असेल, तर ती मराठी माणसांच्याच अनास्थेमुळे नि बेपर्वाईमुळे. प्रत्येकाने असा निश्चय केला की, होता होईल तो आपण मराठी भाषेतच व्यवहार करणार, मराठी शब्दच वापरणार तर मराठी भाषेला पूर्ववैभव प्राप्त होईल.

कै. य. न. केरळकर या इतिहास संशोधक आणि साहित्यिकाने विस्मृतीत गेलेल्या शब्दांची आठवण करून देणारा एक सुंदर निबंध लिहिला होता. विसरभोळयांसाठी स्मरणगाठी ठरावते असे शब्द त्यांनी लाल मखमलीवर हिरे मांडावेत असे सामोरे आणले होते. त्या निबंधातील हा एका उतारा. गुंडगिरी, पुंडावा, किंवा लाठियाळपणा या शब्दांच्या जोडीला तितकाच समर्पक आणि नादमाधुर्यात किंचित सरसच असा 'मुठ मर्दाई' हा शब्द प्रचारात आणण्यास काय हरकत ? 'निशाणबाजी' इतकाच 'चांदमार' हा शब्द जर चांगला आहे तर त्याचा उपयोग का करू नये ? ...'चेटकी' या शब्दाला 'भूताळी' हा प्रतिशब्द किती जणांना ठाऊक असेल ? 'संनस्ट्रोक' या इग्रजी शब्दाचा जसाचा तसाच उपयोग आपण शिष्ट मराठीत सध्या सरसहा करतो. त्याऐवजी 'उन्हाची लुक' हा जुनाच पण यथार्थ शब्दप्रयोग प्रचारात का आणू नये ? .... रात्री पडणारा पाऊस एवढया लांबलचक वाक्याने दर्शविला जाणारा अर्थ 'रातवा' एकाच शब्दाने प्रकट होतो, तर असा शब्द रूढ करून राखणे योग्य होणार नाही का ? दीपगृहाला 'दीपदांडी', प्रेममकलहाल 'लाडझगडा', राजमान्य मार्गाला 'शाहीशिरस्ता', माजघराला 'चाफेखण' अशा रीतीने शब्दाला प्रतिशब्द मिळत गेल्यास सहस्त्रार्जुनाप्रमाणे भाषा पराक्रमी होईल व तिचे विलासही विविध होण्यास मदत होईल.''

इंग्रजी भाषा आज जगातील सर्वाधिक संपन्न अशी भाषा झाली आहे. ती तिच्या संतानांनी शब्दकोशात सतत भर घातली नि त्यांचा आवर्जून वापर चालू ठेवला म्हणूनच य. न. केळकरांचीच पुस्तके 'वाङ्मयाचा वाफा ', 'इतिहासातील सहली', 'भूतावर भ्रमण' आदी पुस्तके आजच्या पिढीतील किती वाचकांनी वाचली आहेत ? चांगले - चांगले जुने लेखकही वेळात वेळ काढून वाचले पाहिजेत. पुस्तकांच्या सहवासात अधिक काळ घालवला पाहिजे, तरच तरणोपाय आहे.

**किंवा**

उतारा क्र.२.

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे असे शास्त्रज्ञ सांगतात. काही शास्त्रज्ञांच्या मते तर समाज करून राहण्याची प्रवृत्ती ही मानवाच्या उपजत प्रवृत्तींपैकीच एक प्रवृत्ती आहे. मनुष्याला समाज करून राहणे आवडते, इतकाच याचा अर्थ असेल तर या विधानाला हरकत घेण्याचे कारण नाही. पण समाज एकत्र टिकवून धरण्यास जे गुण अंगी लागतात ते मानवाच्या अंगी सहजच असतात, उपजतच ते त्याला प्राप्त झालेले असतात, असा जर शास्त्रज्ञांचा अभिप्राय असेल तर मग मात्र त्यांच्या विधानावर अनेक शंकाकुशंका, अनेक आक्षेप मनात निर्माण होऊन त्याची सत्यता मनाला पटेनाशी होते. आतापर्यंतच्या मानवाच्या चरित्राकडे पाहिले तर स्वार्थ, मत्सर,

**पुढे पहा**



munotes.in

2C7370767C7B450E28DCC849F6CF509C

अहंभाव, संकुचित दृष्टी इत्यादी गुणांमुळे माणसाची स्वभावतः विघटनेकडेच प्रवृत्ती असते आणि संघटना घडविण्यासाठी त्याला अनंत प्रयत्न करावे लागतात, जिवाचा आटापिटा करावा लागतो, आणि इतकेही करून पुष्कळ वेळा अपयशच पदरी येते, असे दिसते. अनेक कारणांमुळे छिन्नभिन्न, विघटीत झालेल्या समाजाला संघटीत करून त्याला स्वधर्म, स्वदेश यांची सेवा करण्यास प्रवृत्त करणारा मनुष्य हा महापुरुष ठरतो, त्याला लोक विभूती समजतात. इतकी संघटना ही गोष्ट इतिहासात दुर्मिळ असलेली दिसते. मानवाची संघटीतपणाकडे स्वभावतःच प्रवृत्ती असती तर असे झाले नसते. तो निर्माण करणाऱ्या नेत्याला असल्या अलौकिक पदव्या कोणी दिल्या नसत्या. तेव्हा मनुष्याला समाजात राहणे आवडते हे खरे असेल, आणि अशा राहण्याने आपले संरक्षण होते, आपल्या मनाचा, बुद्धीचा, कार्यक्षमतेचा व एकंदर गुणांचा विकास होतो हेही त्याला कळत असेल; पण ज्या समाजात आपण राहतो व ज्याच्यामुळे आपला सर्वप्रकारे फायदा होतो तो समाज संघटित व बलिष्ठ करण्याकडे मनुष्याची स्वभावतः प्रवृत्ती असते हे म्हणणे इतिहासाला मान्य होईल असे वाटत नाही. आणि हीच मानवी जीवनातील मोठ्या दु:खाची गोष्ट आहे.

**प्र.८.** खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंधलेखन करा. **१०**

अ) माझा आवडता साहित्यिक

ब) प्रदूषणाचा भस्मासूर

क) शेतकऱ्याचे मनोगत

ड) संगणक नसेल तर....

---

munotes.in



2C7370767C7B450E28DCC849F6CF509C